Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Changing Religious Movements in Pre-Medieval Indian History

17-18 January 2020 Special Issue - 101 Vol. II

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editors
Dr. B. G. Gaikwad
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

Co-Editor
Dr. Balasaheb Shankarrao Kshirsagar
Head, Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

Co-Editor
Dr. Sandeep G. Londhe
Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

Scanned with OKEN Scanner

# CURRENT GLOBAL REVIEWER

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-86948

Multidisciplinary International Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL


# Changing Religious Movements in Pre-Medieval Indian History

**17-18 January 2020 Special Issue – 101 Vol. II**


Chief Editor

**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**

*Guide*

**Dr. B. G. Gaikwad**

Principal

Shivaji College, Hingoli (MS)

***Co-Editor***

**Dr. Balasaheb Shankarrao Kshirsagar**

**Head, Department of History**

**Shivaji College, Hingoli (MS)**

***Co-Editor***

**Dr. Sandeep G. Londhe**

**Department of History**

**Shivaji College, Hingoli (MS)**




Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

SPECIAL ISSUE – 101 Vol. II

Title of the issue :

# Changing Religious Movements in Pre-Medieval Indian History

**SHAURYA PUBLICATION**

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 300/-

**PRINTED BY**
Shaurya Offset
Old MIDC , kalamb Road, Latur

EDITION :
**17-18 Jan. 2020**

PRICE : 300 /-

या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन व पुनप्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

# Index

1. लिंगायत धर्माचे तत्त्वज्ञान — 1
प्रा.डॉ.जी.व्ही.गट्टी

2. चिश्ती संप्रदायाचे हिंदू-मुस्लीम ऐक्यातील योगदान — 4
प्रा.कानडे बालासाहेब गोविंदराव

3. गुरुनानक यांची विचारसरणी — 6
डॉ. ओ. व्ही. लिगाडे

4. संत नामदेवांच्या अभंगवाणीतील विविधतेचे दर्शन — 10
*प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.*

5. हैदराबाद मुक्तीसंग्रामामधील धार्मिक चळवळ : आर्य समाज — 13
विकास यशवंता कांबळे

6. वाघळीचे मुधाईदेवी मंदिर — 16
प्रा.डॉ.सोमवंशी एस.आर.

7. महाराष्ट्रातील स्त्री संतांचे सामाजिक संस्कृतिक कार्य — 19
प्रा. मल्हारी पवार.

8. पुर्व मध्ययुगीन काळातील भक्ती चळवळ — 22
प्रा.डॉ.राठोड यु.सी.

9. मध्ययुगाच्या जडन घडणीत भक्ती चळवळीचे योगदान — 25
प्रा.डॉ. वसंत व्यंकटराव कदम

10. शिख पंथ प्रर्वतक : श्री गुरू नानक देवजी — 28
प्रा. किशन मिराशे

11. धार्मिक चळवळ : संत रविदास यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान : एक अभ्यास — 30
डॉ.रामभाऊ देवराव काशीद

12. धार्मिक चळवळ आणि रामानुजाचार्य यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान — 32
डॉ.नाईक एन.डी.

13. मध्ययुगीन समाज व धर्म सुधारणा चळवळ आणि आव्हाने — 34
प्रा. डॉ. सदाशिव बा. दंदे

14. सुफी सिलसीले व त्याचा पडलेला प्रभाव — 37
प्रा. सचिन कोठेकर

15. महात्मा बसवेश्वरांची धर्मसुधारणा चळवळ — 39
प्रा.डॉ.आर.बी.शेटे

16. गौतम बुध्दाने केलेली धार्मिक क्रांती — 41
**प्रा. डॉ. अंभुरे एस. डी.**

17. वारकरी संप्रदायाचे धार्मिक चळवळीतील योगदान — 43
प्रा.डॉ.साईनाथ शेटोड

18. संत नामदेवांच्या अभंगातील धार्मिक चळवळींचा आढावा — 45
प्रा.सिध्दार्थ इंगोले

19. पूर्व मध्ययुगीन धार्मिक चळवळीचा राजर्षी छत्रपती शाहू महाराजावर पडलेला प्रभाव- हिंदू-मुस्लीम एकता एक अभ्यास — 47

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue - 101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

# पुर्व मध्ययुगीन काळातील भक्ती चळवळ

**प्रा.डॉ.राठोड यु.सी.**
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख , नूतन महाविद्यालय,सेलू जि. परभणी

---

**प्रस्तावना -**

महंमद बिन कासीमच्या सिंधवरील स्वारीने भारतात मुसलमानांच्या राजकीयसत्तेच्या व इस्लामच्या झंजावती प्रसाराचा प्रारंभ झाला. आक्रमक, विध्वंसक, मुर्तीभंजक अरबाचे आक्रमण म्हणजे पराभुत हिंदूसैनिकांची लांडगेतोड, निष्पाप हिंदूस्त्री-पुरुषांची, मुलांची, वृध्दांची हि केवळ तेकाफीरहिंदू आहेत म्हणूनसरसकटकत्तल, मंदिराचा व मुर्तिचा विध्वंस मंदिरेतोडून मशिदींची उभारणी आणि तलवारीच्या धाकावर इस्लामाच्या प्रसार सिंध प्रांत मुसलमानाच्या ताब्यात गेलातो करमवाव ६१२ मध्ये गमावलेला सिंध आज पाकिस्तानात आहे.

महमुद गझनीच्या स्वा-या नंतरसुमारे १५ वर्षांनी ११६५ पासून मुहम्मद घोरीच्या भारतावर स्वा-या सुरु झाल्या मुसलमानांच्या स्वा-या म्हणजे निष्पाप निरपराधहिंदू नागरिकांच्या क्रुर व अमाणुषकत्तली, लुटालुट, जाळपोळी, अनन्वीत अत्याचार आणि मंदिराचा व मुर्तीचा विध्वंस मुहम्मद घोरीच्या भारतावरील स्वा-या साम्राज्य विस्तारासाठी होत्या. मुहम्मद घोरीचासरदार मुहम्मद बीन बख्त्यार खिलजी याने १२०० च्या सुमाराससेनसत्तेचा शेवट करुन बंगाल जिंकून घेतला.बंगालही मुसलमानांच्या ताब्यात गेलातोकायमचाच. आज पुर्व बंगाल बांगलादेशाच्या रुपाने अस्तित्वात आहे.मुहम्मद घोरीच्या मृत्यु नंतर १२०६ मध्ये कुतबुद्दीन एबकाने दिल्लीत स्वतःची सत्ता प्रस्थापित केली आणि भारतात स्वतंत्र मुस्लीमसत्तेची, सुल्तान शाहीची सुरुवात झाली.

**भक्ती आंदोलनाचा उदय -**

मुसलमानांनी मंदिराचा विध्वंस केल्यामुळेहिंदुची विद्या केंद्रे नष्ट झाली.मंदिराची डागडुजीकरण्याचा प्रयत्न करणे, मंदिरात अध्ययन-अध्यापनाचा प्रयत्न करणे म्हणजेसंकटाला निमंत्रन देणेहोते. असहाय्य हिंदू प्रजेसाठी वैदीक कर्मकांडाची वा धार्मिक समारंभाची कल्पना करणेसुद्धा अशक्य झालेहोते. रक्षणकर्त्या प्रबळ हिंदू राजसत्ते अभावी केविलवाण्या अवस्थेत जगणा-या हिंदू प्रजेला इश्वरी आराधनेच्या भक्ती मार्गावाचून तरणोपाय उरला नव्हता.संकटसमयी देवच भक्ताच्या मदतीस धावून येतो.या परंपरागत विश्वासावर श्रध्दावान हिंदूची निष्ठाहोती.

हिंदू धर्माप्रमाणेहिंदूचे अंतिम ध्येय मुक्ती आहे. आणि मुक्तीकडे जाणारे ज्ञान, कर्म व भक्ती हेतीन मार्ग आहेत. तुर्क राजवटी पुर्वी हिंदू राजांच्या काळात मुक्तीप्रत नेणा-या ज्ञानमार्गाचे व कर्ममार्गाचे आचरण निर्विघ्न पणे चालूहोते.ऋषीमुनी व तत्व चिंतकांचा ज्ञानमार्ग, यज्ञयागादीकर्ममार्ग, विविध प्रकारचे धार्मिक समारंभ, शाक्तपंथांपासून शैवपंथापर्यंत विविध भक्ती मार्ग या सर्वांच्या म्हणजेच मुक्तीकडे जाणा-या ज्ञान, कर्म व भक्ती या तीनही मार्गाच्या आचरणातकुठलाही व्यत्यय नव्हता परंतुसुल्तानशाहीचातुर्की अंमल सुरु झाल्या बरोबर हिंदूसाठी ज्ञानमार्ग व कर्ममार्ग अशक्य झालेत.राहता राहिला भक्ती मार्ग.स सामान्य हिंदू जनता भक्ती मार्गाकडे वळली.

जातपात, उच्चनीचता, रुढीप्रियता, अंधश्रध्दा या सामाजिक दोषांवर अचुक बोट ठेवुन सामाजिक समतेवर आधारलेली भक्ती हाच इश्वर प्राप्तीचाखरा मार्ग आहे, हे या काळातीलसंतांनी अत्यंत तळमळीने व सातत्याने समाजास पटवून दिले. हिच भक्ती चळवळ होय.

**भक्ती आंदोलन**

**रामानुजनाचार्य -**

रामानुजनाचार्य भक्ती आंदोलनाचे पहिले प्रवर्तक, स्वामी रामानुजनाचार्य यांचा जन्म १२ व्या शतकात झाला.दक्षिण भारतात कांची येथे प्रारंभिक शिक्षण पुर्ण झाल्यावर रामानुजाचार्यांनी यादवांच्या राज्यात वास्तव्य केले.रामानुजाचार्य वैष्णव पंथीहोते.त्यांनी शंकराचार्याच्या मायावाद व आद्वैतावादाचे खंडण करुन त्याठिकाणी विशिष्टाव्दैतवादाचा प्रचारकेला.आत्मा व परमात्मा अलग अलग असलेतरी आत्म्याचा उदय परमात्म्यापासूनहोतो. असेत्यांचे प्रतिपादनहोते.

**रामानंद -**

रामानंदाचा जन्म १४ व्या शतकात बनारस येथील एकाकणोजी ब्राम्हणकूळात झाला.ते रामानुजाचार्याच्यासंप्रदायातील संत होते.हिंदू धर्मातील जातिभेदाचा नायनाटकरण्याचात्यांनी प्रयत्न केला.वर्ण व्यवस्थेची बंधने झुगारुन देऊनत्यांनी सर्व जाती धर्माच्या व्यक्तींना आपल्या शिष्य परिवारात सामील करुन घेतले.महाराष्ट्रीयनसंतांप्रमाणे रामानंदाचा शिष्य संप्रदाय विविध जातीतून आलेलाहोता.त्यांच्या शिष्यांमध्ये जाट, न्हावी, रजपूत, मुसलमान देखीलहोते.

**वल्लभाचार्य -**

१४७९ मध्ये लक्ष्मण भट्ट नामकतेलगु ब्राम्हण पत्नीसह तिर्थ यात्रेला आले असताना त्यांच्या पोटी बनारस येथे वल्लभाचार्यांचा जन्म झाला.वल्लभाचार्यांनी राम एवजी कृष्ण भक्तीचा उपदेशकेला.कृष्ण भक्तीचा महिमा वाढवून राधाकृष्ण या नामोच्चारातत्यांनी वेद मंत्राचे पावित्र्य व सामर्थ्य आणले.

वल्लभाचार्यांनी शुद्ध अद्वैतवादाचा प्रचारकेला. ईश्वरावर प्रेम व भक्ती करुनच आम्हीत्याची दया प्राप्त करु शकतो संसारातील भोग विलास सोडून मानसाने विरक्ती प्राप्त केली पाहीजे, असा वल्लभाचार्य उपदेशकरीत.त्यांच्या शिष्यांनी मात्र भोगविलासाचा ईश्वर भक्तीचे साधन मानल्यामुळे या संप्रदायातकालांतराने अनेक दोष निर्माण झाले.शिष्यांमध्ये फुट पडली.परिणामी वल्लभाचार्यांचे विचार व्यापक प्रमाणावर प्रसार पावू शकले नाहीत.

**चैतन्य महाप्रभू -**

Scanned with OKEN Scanner

चैतन्य महाप्रभुचा जन्म बंगाल मध्ये नादिया येथे फेब्रुवारी १४४६ मध्ये एका ब्राम्हण कुटूंबात झाला.त्यांचे मुळ नाव विश्वांभर असून त्यांना निमाई म्हणत.वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी विश्वंभराने संन्यास घेतला व तेश्रीकृष्ण चैतन्य या नावाने विख्यात झाले.भजन किर्तनाद्वारे ईश्वर भक्ती हे चैतन्य महाप्रभुचे जिवीत कार्यहोते.ईश्वर भक्तीत तल्लीनहोऊन देहभान विसरणे हीत्यांची शिकवण होती.यामुळेचते रामानुजाचार्यापासूनते कबीरा पर्यंतच्या इतर सर्व संतांपेक्षा आगळे वेगळे दिसतात.तर्का ऐवजी भक्तीवर त्यांचा विशेष भर होता.त्यांनीकृष्ण नामाला वेदमंत्राचे सामर्थ्य प्राप्त करुन दिले.

**कबीर -**

कबीराचा जन्म १३९८ मध्येकाशीत एका ब्राम्हण कुटूंबात झाला.परंतु अपरिहार्यकारणांमुळे त्यांना तलावाच्या किना-यावर ठेवण्यात आले.तेथून नुरु नावाच्या मुसलमान विनकराने कबीराला उचलून घेतले व त्याचे पालन पोषणकेले.ज्या भागात जुलाहा (विनकर) बनून कबीराने आपले पुढील आयुष्यकाशी नगरीत व्यतीत केले.तो भाग आज काशी मध्ये कबीर चौराह म्हणून ओळखला जातो.कबीराने रामानंदाचे शिष्यत्व पत्करले.भक्ती मार्ग व सुफी विचार यांच्या समन्वयातून कबीराने निर्गुणतेचे प्रतिपादनकेले.कबीर एकेश्वरवादी परंतु निर्गण, निराकार इश्वराचा उपासकहोता.जातीभेद, धर्मभेद, वृतवैकल्ये, उपासतापास, मुर्तीपूजा, मंदिरात वा मस्जीदीत जाणे या गोष्टींना कबीर विरोध करीत असे.कबीराने आपल्या विचाराचा प्रसारहिंदीतूनकेला.कबीराच्या अनुयायातहिंदू व मुसलमान दोन्ही धर्मातील लोक मोठ्यासंख्येनेहोते व त्याचे अनुयायी उत्तरोत्तर वाढतच गेले.मुसलमान असल्यामुळे कबीराला हिंदू-मुस्लीम एकतेचा आपल्या शिकवणीतून प्रचारकरणे अधिकसोपेहोते.कबीराने त्याच्या आयुष्यभर हिंदु-मुस्लीम ऐक्य साधन्याचा अथक प्रयत्न केला.

**गुरु नानक -**

शिख संप्रदायाचे प्रवर्तक आणि शिखांचे पहिले गुरु नानक यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी लाहोरच्या नैऋत्येस ३५ मैलावर पंजाब प्रांतातील गुजरानवाला जिल्हातील तलवांडी या खेड्यात एकाखत्री कुटूबात झाला. वयाच्या २७ व्या वर्षी सरकारी नोकरीचा व कुटूंबाचा त्याग करुन जगात कोणीहिंदू नाही व कोणी मुसलमान नाही असा समानतेचा उपदेशकरीत नानकांनी भ्रमणयात्रेस सुरुवात केली.आसाम ते बगदाद आणि तिबेट तेश्रीलंका पर्यंत नानकांच्या विचारांवर हिंदू आणि इस्लाम या दोन्ही धर्माचा समान प्रभाव झाला होता.नानकाचा सर्व धर्मातील समानतेवर पुर्ण विश्वास होता.नानक धर्मसुधारक व समाज सुधारक असूनतत्कालीन सामाजिक आणि राजकिय परिस्थिती बद्दल त्यांच्या मनात तीव्र असंतोषहोता. नानकांनी धार्मिक समानता, एक ईश्वर आणि सत्कर्मावर भर दिला,

**दादुपंथी -**

दादुपंथीहा चांभार जातीचा अहमदाबादमधील विणकर असून भक्तीआंदोलनामधील त्याचे योगदान अत्यंत महत्वपुर्ण आहे.बाल्यावस्थेतच दादुदयालनेसंसाराचा त्याग करुन भक्ती आंदोलनात उडी घेतली.दादु दयाल ने एक स्वतंत्र पंथ स्थापन केला.त्याचे अनुयायी दादुपंथी म्हणुन ओळखले जाऊ लागले. आपल्या शिष्याना शिकवण देताना दादु दयाल ने प्रेम, एकता आणि भ्रातृभाव आणि सहिष्णुता यावर जोर दिला, तो म्हणत असेकी, त्यांला हिंदू आणि तुर्क यांच्यात तसेच अल्ला व राम यांच्यात कुठल्याही प्रकारचा भेदभाव आढळत नाही. दादुदयाल मुर्तीपूजा, अवतारवाद, धर्माचे बाह्य अवडंबर आणि कबरींची पूजाकरणे या गोष्टींचा कडवा विरोधक होता.त्याच्या मते ईश्वर एकच असूनतो अजर व अमर आहे.तो सर्वांच्या हृदयातसारखाच विद्यमान आहे.ईश्वराजवळ जर भेदभाव नाहीतर आपण भेदभाव पाळणेहे ईश्वर विरोधी तत्व ठरेल. असेत्याचेठाम मत होते.

**वारकरी संप्रदाय -**

तुर्कीसुलतानाच्या राजवटीत हिंदूच्या राजकिय अस्ताच्या आणि सामाजिक विषमतेच्या अन्यायाच्या काळात महाराष्ट्रातीलसंतांनी भक्ती एक नवीनच पेठ निर्माण केली. ईश्वरास अनन्यभावे शरण जाऊन टाळ मृदूंगाच्या तालावर देहभान विसरुन ब्रम्हानंदी तल्लीनहोऊन नाचणा-या संतांनी भक्तीचा महिमा चढत्याक्रमाने वाढवीत नेला. सभोवताली पसरलेल्या अत्यंत क्लेषदायक व विनाशकारी परिस्थितीवर महाराष्ट्रीयन संताच्या नेतृत्वाखालील सर्वसामान्य जनतेने मात केली.महाराष्ट्रीयनसंतांनी पंढरपुरला विठ्ठलाची एक नवीच नगरी निर्माण केली.या नगरीचे राज्यपद विठ्ठलास देऊन स्वतः त्याची प्रजा झाले.

**ज्ञानेश्वर -**

वरकरी संप्रदायाच्या प्रणेतेपदाचा मान ज्ञानेश्वराना द्यावा लागेल. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची सुरुवात ज्ञानेश्वरांपासून झाली.वास्तविक ज्ञानेश्वर नाथपंथीहोते. परंतू भगवद्‌गीतेवर त्यांनी लिहिलेली टिका ज्ञानेश्वरी वारकरी संप्रदायाचा पूज्य आधारभूत ग्रंथ होय. गीतेत भगवान श्रीकृष्णाने अर्जुनालाकेलेला उपदेश व दिलेलासंदेश ज्ञानेश्वरांनी अतिशय सोप्या, सुलभ मराठी भाषेत घरोघरी पोहोचविला. महाराष्ट्रात भक्तीमार्ग रुजवण्याचे कार्य ज्ञानेश्वरांनी केले.

ज्ञानेश्वरांच्या काळातच वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत असलेल्या पंढरपूरच्या विठ्ठलाने संपुर्ण महाराष्ट्राला वेड लावले.

**नामदेव -**

रामकृष्णहरी आणि विठ्ठल विठ्ठल या नामाचा जयघोष महाराष्ट्रात व महाराष्ट्रापासून थेट पंजाब पर्यंत दुमदुमविणा-या नामदेवांचा काळ १२७०ते १३५० हा आहे. नामदेव शिंपी जातीतील असून त्यांच्या ईश्वर भक्त संयुक्त कुटूंबात जनाबाई ह्या दासीचाही समावेश होता. जनाबाईचीही अभंग रचना प्रसिद्ध आहे. नामदेवांनी प्रचंड प्रमाणात लिहीलेले सर्व अभंग आज उपलब्ध नाहीत.ज्ञानेश्वर-नामदेवाच्या काळातगोरा कुंभार, सेना न्हावी, सावता माळी, चोखा महार, नरहरीसोनार, जनाबाई आदीसंतांची महाराष्ट्रात एक पिढीच उदयास आली.

**निष्कर्ष -**

१) जातपात , उच्चनिचता, रुढी प्रियता, अंधश्रद्धा या सामाजिक दोषांवर अचुक बोट ठेवून सामाजिक समतेवर आधारलेली भक्ती हाच ईश्वरप्राप्तीचा खरा मार्ग आहे.हे या काळातीलसंतांनी अत्यंत तळमळीने व सातत्याने समाजास पटवुन दिले.



Scanned with OKEN Scanner

२) या चळवळीने बलीष्ठ राजकीयसत्तेने सज्ज असलेल्या परकिय इस्लाम धर्मासमोर साधन रहीतहिंदू धर्मास मनोबल देऊन उभे करण्याचेसंताचे उद्दीष्ट साध्य झाले.
३) या चळवळीने मंदिराच्या, मुर्तीच्या, विध्वंसाने धर्म नष्टहोत नसतो. हेसंतांनी सिद्ध करुन दाखवले.
४) या चळवळीने मुक्तीचा नवा मार्ग दाखवला.
५) या चळवळीने बिघडलेल्या परिस्थितीवर मात करण्याची जिद्द दिली.
६) या चळवळीने दैवतांच्या माध्यमातून राष्ट्रीय भक्ती आंदोलन उभारुन मनोबल दिले.
७) या चळवळीने सामाजिक एकतेतूनहिंदू धर्मास तारण्याचे मदतकार्यकेले.

**संदर्भ ग्रंथ सुची -**


१) डॉ. धनंजय आचार्य - मध्ययुगीन भारत.श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २०१४
२) प्रा. प्रभाकर ढवळे - मध्यकालीन भारत. विद्या प्रकाशन, नागपूर-२ १९७१
३) मदन मार्डिकर - मध्यकालीन भारताचा इतिहास. विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगपुरा औरंगाबाद, २००४
४) डॉ. पी.व्हि.काटे - मध्ययुगीन भारत.कैलास पब्लीकेशन्स औरंगपुरा औरंगाबाद, १९९७
५) दिक्षीत बी. सी.- मध्ययुगीन भारत.पिंपळापुरे ॲण्डकं. पब्लीशर्स, नागपूर १९६४
६) कोलारकर श. गो.- भारताचा इतिहास.श्रीगणेश प्रकाशन, नवी रामदास पेठ, नागपूर-१० १९७८
७) डॉ. वसंत तुकाराम देशपांडे - मध्ययुगीन भारताचा इतिहास. अभय प्रकाशन, नांदेड -१९९८
८) डॉ. सोमनाथ रोडे - मध्ययुगीन भारताचा राजकिय व सांस्कृतिक इतिहास.पिंपळापुरे ॲण्डकं. पब्लीशर्स, नागपूर १९९७




Scanned with OKEN Scanner